18 JUL 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# समर्पित, नियोजनबद्ध प्रयत्नांमुळेच यशप्राप्ती : कुलगुरू डॉ. राजनीश कामत

• विद्यार्थी विकास विभागामार्फत विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यार्थ्यांनी समर्पितपणे आणि नियोजनबद्ध प्रयत्न केल्यास त्यांना निश्चित यश प्राप्त होते, हे विद्यापीठाच्या संघाने विविध स्पर्धांतील घवघवीत यशातून सिद्ध केले आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघात सहभागी होऊन युवा महोत्सव, राष्ट्रीय कव्वाली, आविष्कार, अन्वेषण स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झाला. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची विशेष उपस्थिती होती.



कोल्हापूर : युवा चित्रकार आदित्य घडशी यांनी उत्स्फूर्तपणे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे व्यंगचित्र काढून भेट दिले.

सुरूवातीला प्रातिनिधिक स्वरूपात निवडक कलागुणांचे सादरीकरण केले. यामध्ये लोककला वाद्यवृंदासह रूची पटेल (भरतनाट्यम्), सुमंत कुलकर्णी आणि सहकारी (पांडुरंगांचे अभंग), रवीराजा भिसे (मिमिक्री), ऋषीकेश देशमाने, सुमंत कुलकर्णी आणि सहकारी (कव्वाली), वैष्णवी पोतदार (वक्तृत्व) यांनी सादरीकरण केले. याप्रसंगी, युवा चित्रकार आदित्य घडशी यांनी उत्स्फूर्तपणे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे व्यंगचित्र काढले. ते त्यांना भेट देण्यात आले.

तत्पूर्वी, मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांत पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना १६० पारितोषिकांचे वितरण केले. यावेळी सहभागी विद्यार्थी शुभम गिरीगोसावी, संघ व्यवस्थापक डॉ. प्रमोद कसबे, वैजयंता पाटील, विद्यार्थी मार्गदर्शक शंतनू पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शिराळा येथील विश्वासराव नाईक महाविद्यालयाचे डॉ. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा समन्वयक डॉ. आर.एच. अतिग्रे यांनी आभार मानले.

## विद्यापीठाचा लौकिक उंचावला

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, युवा महोत्सव, राष्ट्रीय कव्वाली, आविष्कार, अन्वेषण स्पर्धेमध्ये विद्यापीठ आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग उत्साहवर्धक आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये मिळविलेले हे यश निश्चित उल्लेखनीय व वाखाण्याजोगे आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचा लौकिक उंचावला आहे.

18 JUL 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय युवा संसदमध्ये विद्यापीठाची हॅट्ट्रिक

कोल्हापूर, ता. १७ : केंद्र सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयाने घेतलेल्या १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग तिसऱ्यांदा गटस्तर विजेतेपदाची ट्रॉफी पटकावली. यापूर्वी १४ व्या आणि १६ व्या स्पर्धेमध्ये विद्यापीठाने गटस्तरीय विजेतेपद मिळवले होते.

नवी दिल्ली येथे संसद भवन परिसरातील बालयोगी सभागृहात केंद्रीय संसदीय कार्य व कायदामंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते विद्यापीठाच्या संघाला विजेतेपदाचा चषक प्रदान केला. यासह विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांना 'गुणवत्तापूर्ण बेस्ट प्रेझेंटर' पुरस्काराने गौरविले. त्यात स्वप्नील माने, संदेश लडकट, नेहा शिंदे, तेजस सन्मुख, श्रेया म्हापसेकर, चंदनकुमार ओझा, श्रुती कुरणे, प्रतिभा बामणे यांचा समावेश आहे. युवा संसद स्पर्धा समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांचा सत्कार करण्यात आला. युवा संसद संघासोबत डॉ. संतोष सुतार उपस्थित होते. युवा संसदेमध्ये शपथ ग्रहण, प्रश्न कालावधी, विशेषाधिकार भंग प्रस्ताव, करणे आदी मुद्यांवर प्रत्यक्ष संसदेप्रमाणे कामकाज चालवले गेले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. कविता वड्राळे, सुखदेव उंदरे, आकाश ब्राह्मणे आदींनी नियोजन केले.



कोल्हापूर : भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयाने घेतलेल्या १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या विजेतेपदाचा चषक केंद्रीय संसदीयकार्यमंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचा संघ.

या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव, संसदीय प्रक्रिया, संवाद कौशल्यांचा विकास साधला जातो. राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तेची आणि सुसंस्कृत नेतृत्वाच्या जडणघडणीची पुनर्प्रचिती आली.

\- डॉ. आर. के. कामत, कुलगुरू

18 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

# शिवाजी विद्यापीठाला राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत तिसऱ्यांदा विजेतेपद

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग तिसऱ्यांदा गटस्तर विजेतेपदाची ट्रॉफी पटकावली आहे. यापूर्वी १४ व्या आणि १६ व्या स्पर्धेमध्ये विद्यापीठाने गटस्तरीय विजेतेपद प्राप्त केले होते.

राजधानी नवी दिल्ली येथे संसद भवन परीसरातील बालयोगी सभागृहात केंद्रीय संसदीय कार्य व कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या संघाला विजेतेपदाचा चषक प्रदान करण्यात आला. याबरोबरच शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांना "गुणवत्तापूर्ण बेस्ट प्रेझेंटर" पुरस्कार प्रदान करण्यात आला. यामध्ये स्वप्निल माने, संदेश लडकट, नेहा शिंदे, तेजस सन्मुख, श्रेया म्हापसेकर, चंदनकुमार ओझा, श्रुती कुरणे, प्रतिभा बामणे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठ युवा संसद स्पर्धा समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनाही सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. युवा संसद संघासोबत डॉ. संतोष सुतार उपस्थित होते.

या युवा संसदेमध्ये शपथ ग्रहण करणे, श्रद्धांजली व्यक्त करणे, नवीन मंत्र्यांचे परिचय करणे, प्रश्न कालावधी, विशेषाधिकार भंग प्रस्ताव, आवश्यक अहवाल किंवा दस्तऐवज सभेमध्ये मांडणे, राज्य सभेकडून संदेश लोकसभेमध्ये सादर करणे, विदेशी प्रतिनिधींचे संसदेमध्ये औपचारिक स्वागत करणे, अतीमहत्वाच्या विषयाकडे संसदेचे लक्ष वेधून घेणे, बिल पास करणे, नवीन कायदे, विधेयक प्रस्तावांचा विचार करणे, सभागृह विसर्जित करणे या मुद्यांवर प्रत्यक्ष संसदेप्रमाणे कामकाज चालवले गेले.

सुसंस्कृत नेतृत्वाच्या जडणघडणीची प्रचितीः कुलगुरू

या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव, संसदीय प्रक्रिया आणि संवाद कौशल्यांचा विकास साधला जातो. राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तेची आणि सुसंस्कृत नेतृत्वाच्या जडणघडणीची पुनर्प्रचिती आली, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले आहे.

विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनीही या संघाचे व समन्वयकांचे अभिनंदन केले आहे. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. कविता वड्राळे, डॉ. सुखदेव उंदरे, आकाश ब्राह्मणे, विद्यार्थी विकास विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहकार्य केले.

18 JUL 2026
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संघर्षशील नेतृत्व म्हणजे डॉ. एन. डी. पाटील

- ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ
- शिवाजी विद्यापीठात डॉ. एन. डी. पाटील यांची जयंती साजरी

**प्रतिनिधी ,कोल्हापूर**

ज्येष्ठ नेते, इतिहास संशोधक डॉ. एन. डी. पाटील यांनी समाज कार्यात स्वार्थाला स्थान न देता पारदर्शक, मूल्यनिष्ठ व संघर्षशील नेतृत्व उभे केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'डॉ. एन.डी. पाटील व सामाजिक चळवळी" या विषयावर त्यांनी राजकीय, सामाजिक व शैक्षणिक चळवळींचा आढावा घेतला. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्यावतीने याचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. डॉ. सरोज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. एन. डी. पाटील यांच्या जीवनावर शाहीर रंगराव पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडा सादर केला.



कोल्हापूर : पोवाडा सादर करताना शाहीर रंगराव पाटील

कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व हे सखोल अध्ययन, चिंतन आणि मूल्याधिष्ठित कृतीतून घडल्याचे सांगितले.

डॉ. सरोज पाटील म्हणाल्या, डॉ. एन.डी. पाटील हे समाजाच्या वेदनांवर हळुवार फुंकर घालणारी सुखद वाऱ्याची झुळुक होती. त्यांनी आयुष्यभर जोपासलेल्या उच्च नीतिमानतेचा आम्हा सर्वच कुटुंबियांना नेहमीच अभिमान आहे.

समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले, डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. टी.एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. अक्षय सरवदे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी,विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

18 JUL 2026

पुढारी

# विद्यापीठात आज क्रीडा मानसशास्त्र, पोषण, डोपिंग विषयावर चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत शनिवारी (दि. १८) दुपारी २ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात 'क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग' या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

कुलगुरू डॉ. आर. के. कामत अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमात स्पोर्टस् न्यूट्रिशनिस्ट व वेलनेस कन्सल्टंट अवंती दामले खेळाडूंसाठी संतुलित आहार, स्पोर्टस् न्युट्रिशयन व कार्यक्षमतेत पोषणाचे महत्त्व व डोपिंग याविषयी मार्गदर्शन करतील. प्रसिद्ध फिजिओथेरपिस्ट व सल्लागार डॉ. यशवंत वेलणकर हे क्रीडा मानसशास्त्र, मानसिक तयारी, माईंडफुलनेस, तणाव व्यवस्थापन आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी आवश्यक मानसिक कौशल्यांबाबत मार्गदर्शन करतील.


कार्यक्रमास कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा उपसंचालक सुहास पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या सिरस उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्रास उपस्थित राहावे, असे आवाहन क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले आहे.

1 8 JUL 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात आज विशेष चर्चासत्राचे आयोजन

- क्रीडा मानसशास्त्र, पोषण आणि डोपिंग याविषयावर होणार मार्गदर्शन



**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत शनिवारी (दि. १८) "क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग" या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान दुपारी २ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी असतील, तर, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असेल.

कार्यक्रमात सुप्रसिद्ध स्पोर्ट्स न्यूट्रिशनिस्ट व वेलनेस कन्सल्टंट अवंती दामले या खेळाडूंसाठी संतुलित आहार, स्पोर्ट्स न्यूट्रिशन आणि कार्यक्षमतेत पोषणाचे महत्त्व व डोपिंग याविषयी मार्गदर्शन करतील. तसेच, प्रसिद्धफिजिओथेरपिस्ट व सल्लागार डॉ. यशवंत वेलणकर हे क्रीडा मानसशास्त्र, मानसिक तयारी, माइंडफुलनेस, तणाव व्यवस्थापन आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी आवश्यक मानसिक कौशल्यांबाबत मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा उपसंचालक सुहास पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या सिरस यांची प्रमुख उपस्थिती असेल.

चर्चासत्राला कोल्हापूर, सांगली, सातारा तसेच अन्य जिल्ह्यांतील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी, खेळाडू, शारीरिक शिक्षण संचालक, शारीरिक शिक्षण अधिव्याख्याते, प्रशिक्षक, स्पोर्ट्स क्लब्स, विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, पालक आणि क्रीडाप्रेमी नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ शरद बनसोडे यांनी केले आहे.

18 JUL 2026 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलविद्याविषयक संशोधनाला गती मिळणार

## विद्यापीठाचा इन्फ्राप्लान समूहासमवेत सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. १७: जलसंपदाविषयक पायाभूत अभियांत्रिकी सुविधा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या इन्फ्राप्लान समूहासमवेत शिवाजी विद्यापीठाने नुकताच सामंजस्य करार केला. संशोधन, कौशल्य विकास व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वृद्धिंगत करण्याचा उद्देश करारामागे आहे.

या समूहामध्ये इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, सिग्मा इन्फ्राप्लान इंजिनिअरिंग, इन्फ्राप्लान हायड्रॉलिक लॅबोरेटरी यांचा समावेश आहे. विद्यापीठातील भूगोल अधिविभाग आणि हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्रामध्ये जलविद्याविषयक संशोधन सुरू आहे. या संशोधनाला उद्योग क्षेत्राची जोड मिळण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरणार आहे. करारावर कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि इन्फ्राप्लान समूहाचे संचालक आशीष दोशी यांनी स्वाक्षरी केल्या. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. व्ही. गुरव, भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, तुकाराम डोंगळे, गणेश न्हिवेकर, सोमनाथ पवार उपस्थित होते.

> या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण, लाईव्ह इंडस्ट्री प्रोजेक्ट्स, संयुक्त संशोधन, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्टअप्स, पेटंट विकास तसेच विविध सरकारी संशोधन प्रकल्पांमध्ये सहकार्याची संधी मिळणार आहे. उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना देणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.
> -डॉ. सचिन पन्हाळकर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 JUL 2026

पुण्यनगरी

# अण्णा भाऊंच्या विचारांची समाजाला गरज

**लोकशाहीर तथा साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांची १८ जुलै रोजी पुण्यतिथी आहे. या निमित्ताने त्यांना वाहिलेली शब्दसुमने.**

आज टेक्नॉसॉवी, ग्लोबलायझेशन आणि 'एआय'च्या जगात उंच भरारी घेण्याची आवश्यकता आहे. याकडे मातंग समाजातील विविध घटकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. ज्या ज्या ठिकाणी शिक्षणासंदर्भात आवश्यकता असल्यास मातंग समाज तरुण मंडळे, विविध मंडळांच्या किंवा वैयक्तिक स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे. आजही मातंग समाज वाड्यामध्ये, चौकटीमध्ये स्थिरावल्याचे दिसून येत आहे. या समाजातील मुलांसाठी शिक्षणाची चळवळ राबवण्याची नितांत गरज आहे.



अण्णा भाऊंच्या समाजाने शिक्षण घेत असताना अनेक कंगोरे असलेल्या शिक्षण प्रणालीचा वापर करून शिक्षण घ्यावे. या विखारी जगात स्थिर व्हावयाचे झाल्यास सखोल आणि ज्ञानी व्हावे लागेल, यासाठी अण्णा भाऊंचा आदर, अभिमान, स्वाभिमान बाळगत असू तर अण्णा भाऊंना, छत्रपती शाहू महाराजांना, म. फुले, बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे यांना आदर्श मानले पाहिजे. अण्णा भाऊंनी लिहिलेल्या सर्व साहित्याची आठवण करून मातंग समाजाची शैक्षणिक चळवळ उभी करावयाला हवी. ही चळवळ फक्त आणि फक्त शिक्षणाबद्दल असावी. गल्लीपासून दिल्लीपर्यंत आणि दिल्लीपासून लंडनपर्यंत चळवळ वाढवणे आवश्यक आहे.

१९५८ साली पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून त्यांनी जे भाषण केले, त्याचा उल्लेख करणे आवश्यक वाटतो. ते म्हणतात, 'पृथ्वी ही शेषनागाच्या

डॉ. उत्तम सकट
उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

मस्तकावर तरलेली नसून श्रमिकांच्या, कष्टकऱ्यांच्या, दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.' केवढी ही प्रगल्भता. अण्णा भाऊंच्या कथा/कादंबऱ्यांतील मानवतावाद ज्ञातच आहे. अण्णा भाऊंनी ३२ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, १० प्रसिद्ध पोवाडे, ३ नाटके, प्रवासवर्णन, १२ उपहासात्मक लेख, ६ पटकथा यातून मानवतावादाचे तत्त्वज्ञान चित्रित केले आहे. यांचा वाचकांनी बोध घेतला तरी जीवनात शिक्षणाची क्रांती करता येईल आणि समाजमन बदलेल. मातंग समाजानेही राज्यघटनेने, कायद्याने केलेल्या अनुसूचित जातीसाठी असणाऱ्या सर्व सोयी-सुविधांचा लाभ घेऊन प्रगती साधणे आवश्यक आहे. एक रांगड्या वाणीचा कलावंत आपल्या कर्माचा, राबत्या देहाचा, झुंजार स्वभावाचा, कामगारांची चळवळ उभारून १८ जुलै, १९६९ रोजी निघून गेला. त्यांची आठवण जतन करूया, विचार जोपासूया आणि समाजाला नवी दिशा, नवी आशा प्रज्वलित करूया. हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.